# Paper Name : Maharashtra Times

# Date of Publication : 24/01/2026

Article regarding R.A. Podar College NSS Rural Camp in Barhanpur



मटा अँकर

## खिळ्यांपासून झाडांची सुटका; राष्ट्रीय सेवा योजनेचा अभिनव उपक्रम

# बऱ्हाणपूरमध्ये पोदारचे निसर्गसेवक

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

आजची तरुणपिढी केवळ समस्यांवर बोलत नाही, तर त्या सोडवण्यासाठी प्रत्यक्ष कृती करते, याचे ठळक उदाहरण पालघर जिल्ह्यातील बऱ्हाणपूर गावात पाहायला मिळाले आहे. एस. पी. मंडळींच्या रा. आ. पोदार वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय (स्वायत्त) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने नुकतेच ग्रामीण निवासी शिबिर भरवून गावामधील 'जखमी' झाडांवर उपचार करण्याचा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. तसेच, स्थानिकांना त्यांच्याकडील वनसंपत्तीतून उपजीविका देऊ शकणाऱ्या साधनांची माहिती देण्यात आली.

महाविद्यालयाने ५ ते ११ जानेवारीदरम्यान हे शिबिर राबवले. या शिबिरादरम्यान गाव परिसर आणि शिबिर स्थळाजवळील झाडांचे निरीक्षण करत असताना, अनेक झाडांमध्ये खिळे व हूक ठोकलेले असल्याचे स्वयंसेवकांच्या निदर्शनास आले. यामुळे झाडांच्या नैसर्गिक वाढीस अडथळा येत असून, त्यांना गंभीर इजा होत होती. मात्र, या समस्येकडे केवळ पाहून दुर्लक्ष न करता स्वयंसेवकांनी 'हीलिंग ट्रीज' हा पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला. एकूण १५हून अधिक झाडांमधील खिळे आणि हूक काळजीपूर्वक काढून टाकण्यात आले. त्यानंतर त्या भागांवर हळदीचा लेप लावून संसर्ग रोखण्यासाठी उपचार करण्यात आले. या उपक्रमाचे छायाचित्रण व लघु रील तयार करून पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली.

पर्यावरणासह ग्रामीण उपजीविकेच्या संधींचाही विचार करत 'इकोरूट्स : निसर्गातून उत्पन्न' हा उपक्रम राबवण्यात आला. या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गावातील १५०हून अधिक घरांना भेटी देऊन सर्वेक्षण केले. शेवगा, कढीपत्ता, कडुनिंब, मेंदी, आवळा यांसारखी उपयुक्त झाडे मोठ्या प्रमाणावर आढळून आली. या झाडांच्या पानांपासून पावडर तयार करून शहरांमध्ये विक्रीची संधी उपलब्ध असल्याची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली. अनेक ग्रामस्थांना या संधींची यापूर्वी माहिती नव्हती.

हा संपूर्ण उपक्रम पोदार महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. विनिता पिंपळे, उपप्राचार्य कपिलदेव इंदुरकर आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी अक्षय भ. टिंगनवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला.

> “ रा. आ. पोदार वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय (स्वायत्त) येथील राष्ट्रीय सेवा योजना नेहमीच असे विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत असते आणि यासाठी प्रत्येक स्वयंसेवक मेहनत घेत असतो, याचा आम्हाला नेहमीच आनंद आणि अभिमान वाटतो. – विनिता पिंपळे, प्राचार्या

**दि. २४/०१/२०२६, महाराष्ट्र टाइम्स**